## अरुण गवळीची सुटका

**नागपूर ।** दहशतवादातून राजकारणाकडे वळण घेणारा कुख्यात गँगस्टर अरुण गवळी १७ वर्षांनंतर नागपूर सेंट्रल कॅरागृहातून बाहेर आला. २८ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने त्याला बेल मंजूर केली. नागपूर कारागृह प्रशासनाने आवश्यक कायदेशीर औपचारिकता पूर्ण केल्यानंतर, गवळी दुपारी सुमारे १२.३० वाजता बाहेर आले. नागपूर पोलिसांच्या सुरक्षेत गवळी नागपूर विमानतळावर पोहचला तेथून तो मुंबईसाठी रवाना झाला.


मुळव्याध, फिशर, भगंदर
इंजेक्शन व लेझरद्वारे उपचार
संडासद्वारे रक्त पडणे व कोंब येणे
गुदमार्गाच्या ठिकाणी खाज, सुज आग व वेदना होणे
गुदमार्ग लहाण होणे
गुदद्वाराजवळ सेप्टीक होणे
माकड हाडाजवळ, खाज, गाठ किंवा पु होणे
कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध.
कृपया येतांना अपॉईमेंट घेऊन येणे...
डॉ.मनोज पाटील
M.S. [Shalya] | F.A.R.C.S. | जनरल सर्जन व गुदविकार तज्ञ
लोढा हॉस्पीटल, जिल्हा बँकेजवळ, रिंग रोड, जळगांव. 70302 33533


## संपादकीय

### विकास वाटेवरचा अग्रणी

आज ४ सप्टेंबर २०२५! दैनिक नाशिक 'देशदूत'चा ५६ वा वर्धापनदिन! 'नाशिकच्या मातीतील दैनिक' ही ओळख आता मनामनांवर ठसली आहे. जिल्ह्याच्या विकासात 'देशदूत' नेहमीच अग्रणी राहिला आहे. वर्धापनदिनानिमित्ताने भविष्याचा वेध घेताना भूतकाळातील वाटचालीचे अवलोकनही केले जाते. तसे करताना 'देशदूत'ने रोवलेले अनेक मैलाचे दगड नजरेच्या टप्प्यात सहज येतात. जिल्ह्याच्या राजकारणाचा पट नव्याने रचण्यात 'देशदूत'ने मोलाची भूमिका बजावली. ते करताना जनहित साधण्याचे माध्यम आहोत, याचा कधीही विसर पडू दिला नाही. अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या निराकरण चळवळींचा 'देशदूत' नेहमीच केंद्रबिंदू आणि आधार राहिला. यापुढेही राहील. नाशिक जिल्ह्यातील शेतकरी 'देशदूत'ला हक्काचे व्यासपीठ मानतात. त्यांचे प्रश्न धसास लावण्याचा नेहमीच प्रयत्न असतो. समाजासमोर आदर्श नाहीत, अशी तक्रार अनेक जण करतात. 'देशदूत'ने मात्र नेहमीच पर्याय देण्याचा, समाजासमोर आदर्श उभे करण्याचा प्रयत्न सातत्याने केला. समाजोद्धारासाठी झटणाऱ्या कानाकोपऱ्यातील माणसांचा शोध 'देशदूत' नेहमीच घेत आला आहे. कधी हा शोध 'गुणवंतांच्या' रूपात तर कधी 'तेजस' किंवा 'कर्मयोगिनी' पुरस्कारांच्या रूपाने समाजासमोर ठेवला जातो. असामान्य कामगिरी करणाऱ्या गुणवंतांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली. उत्तम कामगिरी करणाऱ्या युवा उद्योजकांना 'तेजस' पुरस्काराने सन्मानित केले. कर्तृत्ववान महिलांना 'कर्मयोगिनी' पुरस्काराने सन्मानित केले. कधी गुरुजन आणि शिक्षकांच्या कामगिरीची दखल घेतली. यावर्षी एका पुरस्कार सोहळ्याने थेट विदेशात झेप घेतली. पुरस्कारार्थींना व्हिएतनामसारख्या प्रगतिशील देशात पुरस्कार प्रदान केले. काळाबरोबर पुरस्कारांचे नाव बदलत गेले, पण गाभा मात्र तोच आहे. समाजाच्या भल्यासाठी लोक आपापल्या परीने काम करीत असतात. त्याची दखल घेऊन त्यांच्या कर्तृत्वाची गाथा लोकांपर्यंत पोहोचवून लोकांना प्रेरणा देणे हे 'देशदूत' आपले कर्तव्यच मानतो. समाजाशी संवाद साधणाऱ्या उपक्रमांची यादी भली मोठी होऊ पान २ वर

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1450 |
| नवती (२) | : 1250 |

### मिश्कीली




# आंदोलन संपले; चांगले झाले पण....

# नुकसान भरपाई कोण करणार?

## उच्च न्यायालयाची आयोजकांना विचारणा



**मुंबई ।** मराठा समाजाला कुणबी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची मागणी राज्य सरकारने मान्य केली. त्यानंतर, जरांगे यांनी पाच दिवसांपासून आझाद मैदानात केलेले आमरण उपोषण सोडले आणि आंदोलनही संपले. हे सगळे असले तरी पाच दिवसांच्या आंदोलनदरम्यान मुंबईत सार्वजनिक मालमत्तेच्या झालेल्या नुकसान भरपाईचे काय ? अशी विचारणा करून त्याबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना दिले.

जरांगे यांनी चिथावणी दिल्याने मोठ्या प्रमाणात आंदोलक मुंबईत दाखल झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे, याबाबतही जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने नमूद केले. त्यावर जरांगे यांनी अशा प्रकारची कोणतीही भाषणे केलेली नाहीत. किंबहुना, आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून ते उपोषणाला बसले होते, असा दावा करून जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी आरोपांचे खंडन केले. त्याची दखल घेऊन तोंडी माहिती देऊ नका, तर प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करा, असे आदेश न्यायालयाने दिले.



विषय मार्गी लागला असल्याने याचिका प्रलंबित ठेवण्यात अर्थ नाही. परंतु, आम्हाला काहीही तोंडी नको आहे. त्यामुळे, जरागे आणि आदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्रावर बाजू मांडावी. त्यानंतर याचिका निकाली काढली जाईल, असे स्पष्ट करून न्यायालयाने हे प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी जरांगे आणि आयोकांना चार आठवड्यांची मुदत दिली.

तर, आंदोलकांनी रस्ते, पदपथ, बस व रेल्वे स्थानके अडवण्यापलिकडे काहीही नुकसान केलेले नाही, असे जरांगे यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. त्यावर, न्यायालयाने काही छायाचित्रे दाखवत यात नुकसान झाल्याचे दिसत असल्याचे म्हटले. तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रांतून दिसत आहे याचा पुनरूच्चार न्यायालयाने केला. तेव्हा आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी पुन्हा एकदा न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.

### मुंबईत नऊ गुन्हे दाखल

आंदोलन सरकारच्या मध्यस्थीने संपल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली असता आंदोलन काळात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई कोणाकडून वसूल करणार, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. त्यावर, पोलिसांनी या प्रकरणी काही गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे, त्याद्वारे भरपाईचा मुद्दा निकाली लावला जाईल, असे आंदोलनाच्या आयोजकांतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

## ओबीसींसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती

### बावनकुळे अध्यक्ष,गुलाबराव पाटलांसह आठ सदस्य

**मुंबई ।** मराठा आरक्षणासाठी मोठा निर्णय घेतल्यानंतर राज्य सरकारने ओबीसींसाठीही महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ओबीसींच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली असून चंद्रशेखर बावनकुळे समितीचे अध्यक्ष असतील.या उपसमितीत छगन भुजबळ, पंकजा मुंड,गुलाबराव पाटील यांच्यासह आठ मंत्री आहेत.

राज्य सरकारने नुकतेच मराठा आरक्षणासंबंधी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याविरोधात ओबीसी नेत्यांनी आवाज उठवला. राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी तर मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यानंतर आता ओबीसींसाठीही उपसमितीच्या माध्यमातून विकासात्मक निर्णय घेण्याचा निर्णय झाला आहे.



ओबीसींच्या विकासासाठी ही उपसमिती गठीत करण्यात आली असून त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीबाबत कार्यक्रम आखले जाणार आहेत. तसेच ओबीसींच्या योजनांबाबत ही समिती कामकाज पाहणार आहे.

या समितीचे अध्यक्षपद हे भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे असणार आहे. तर या समितीत भाजपचे चार, राष्ट्रवादीचे दोन आणि शिवसेनेचे दोन मंत्री असणार आहेत. यामध्ये छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे हे समितीचे सदस्य असतील.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गुरूवारी सकाळी ११ वाजता नागपुरात सुरू असलेल्या राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या साखळी उपोषणाला भेट देणार आहेत. यावेळी ते महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्याशी चर्चा करतील. फडणवीसांच्या भेटीनंतर ओबीसींचे उपोषण सुटेल.

## मुक्ताईनगर येथे लाखाचा गुटखा जप्त

**मुक्ताईनगर ।** येथील पुर्णाडफाट्यावर जळगावच्या स्थानिक गुन्हे शाखेने लाखोंचा गुटखा जप्त केला. बुधवारी सकाळी ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्गावरून एका ट्रकमधून अवैध गुटख्याची वाहतूक केली जात असल्याची माहिती नाकाबंदी पोलिसांना मिळाली. त्यानुसार पुर्णाडफाटावर नाकाबंदी केली असता, एका आयशर ट्रकमध्ये गोण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा आणि सुगंधित पान मसाला आढळून आला. ट्रकमधील चालकाकडे गुटखा वाहतुकीसाठी आवश्यक असलेला कुठलाही परवाना आढळून आला नाही. पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतले असून, या प्रकरणी मुक्ताईनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## वर्षभरात देश नक्षलमुक्त करणार!

### गृहमंत्री अमित शाह यांनी केला जवानांचा सत्कार

**नवी दिल्ली ।** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट यशस्वीरित्या पार पाडणाऱ्या सीआरपीएफ, छत्तीसगड पोलीस, डीआरजी आणि कोब्रा जवानांची भेट घेतली आणि त्यांना सन्मानित केले. यावेळी छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि उपमुख्यमंत्री विजय शर्मा देखील उपस्थित होते.

नक्षलविरोधी मोहीम ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट यशस्वी केल्याबद्दल सर्व सुरक्षा दलांच्या जवानांचे अभिनंदन केले. तसेच, ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट दरम्यान जवानांनी दाखवलेले शौर्य आणि पराक्रम नक्षलविरोधी मोहिमेच्या इतिहासातील सुवर्ण अध्याय म्हणून नोंदवला जाईल, असेही शाह म्हणाले.



अमित शाह म्हणाले, जोवर सर्व नक्षलवादी आत्मसमर्पण करत नाहीत, पकडले जात नाहीत अथवा त्यांचा खात्मा होत नाही, तोवर मोदी सरकार स्वस्थ बसणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आम्ही भारत नक्षलमुक्त करूनच राहू. केंद्रीय गृहमंत्री पुढे म्हणाले, उन्ह आणि प्रत्येक पावलावर आयईडीचा धोका असतानाही, सुरक्षा दलांनी मोठ्या शौर्याने ही कारवाई यशस्वी केली आणि नक्षलवाद्यांचा बेस कॅम्प उद्धस्त केला. करेगुट्टालू टेकडीवरील नक्षलवाद्यांचे साहित्य आणि पुरवठा साखळीही छत्तीसगड पोलीस, सीआरपीएफ, डीआरजी आणि कोब्राच्या सैनिकांनी उद्धवस्त केली. नक्षलवाद्यांनी देशातील कमी विकास झालेल्या भागांचे मोठे नुकसान केले. त्यांनी शाळा आणि रुग्णालयेही बंद केली. सरकारी योजना स्थानिकांपर्यंत पोहोचू दिल्या नाहीत.

## संजय राऊतांकडून फडणवीसांचे कौतुक

**मुंबई ।** मी देवेंद्र फडणवीस यांच्या संयमाचे कौतुक करीन. आंदोलक नेत्यांनी फडणवीस यांच्यावर जहरी भाषेत टीका केली. त्याचवेळी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी संयम सोडला नाही, हे कौतुकास्पद आहे, असे म्हणत राऊतांनी फडणीसांचे तोंडभरून कौतुक केले. तर काल दोन्ही उपमुख्यमंत्री कुठे होते? असा सवाल राऊतांनी केला.

मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मराठा बांधवांनी मुंबईत मोठे आंदोलन झाले. काल सरकारने मागण्या मान्य केल्या, जर जरांगे व आंदोलक समाधानी आहेत तर आम्हीही समाधानी आहोत. नवी मुंबईतही त्यांनी गुलाल उधळला होता. आता मुंबईतील गुलालात व नवी मुंबईच्या गुलालात काय फरक आहे ते बघावे लागेल. जरांगे पाटील यांनी फडणवीस यांचे आभार मानले, ही चांगली गोष्ट आहे. सरकारचेही आम्ही अभिनंदन करतो, असे संजय राऊत म्हणाले.





जरांगे पाटील ज्या समाजासाठी लढत होते, त्या समाजाचे दोन्ही उपमुख्यमंत्री आहेत. एकनाथ शिंदे मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत गुलाल उधळायला नवी मुंबईत गेले होते. काल ते कुठे दिसले नाहीत, याचे कारण काय? फडणवीस स्वत: वाटाघाटीत गुंतलेले. बाकी एकनाथ शिंदे, अजित पवार कुठे होते? ते आनंद सोहळ्यात का सहभागी झाले नाहीत? असा सवाल संजय राऊतांनी केला आहे. दरम्यान देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करतांना मात्र संजय राऊत चांगलेच खुश दिसले. सरकारने अर्थात देवेंद्र फडणवीसांनी ज्या पध्दतीने परिस्थिती हाताळली तिचे कौतुकच आहे. असे ते म्हणाले

### आझाद मैदान रातोरात साफ

पाच दिवस चाललेल्या मराठा आंदोलनानंतर अखेर मुंबई शहरातील जनजीवन हळूहळू पूर्वपदावर आले आहे. आंदोलकांनी मुंबई सोडल्याने मुंबई महानगरपालिकेने देखील परिसर स्वच्छ केला आहे. मात्र पाच दिवसांनंतर हा परिसर स्वच्छ करताना कर्मचाऱ्यांची चांगलीच दमछाक झाली. आझाद मैदान परिसरातून १०१ मेट्रिक टन कचरा गोळा करत मोठी स्वच्छता मोहीम राबवली आहे. मंगळवारी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर, दक्षिण मुंबईचे रस्ते आंदोलकांच्या गर्दीतून मोकळे झाले. दुपारी ११ वाजण्याच्या सुमारास, पोलीस आणि आरएएफ दलांनी सीएसएमटी स्टेशन परिसर मोकळा करण्यासाठी पावले उचलली.


तीन पिढ्यांहूनही अधिक काळ अनुभवसिद्ध
होमिओ लॅबोरेटरीज्ची अस्सल व दर्जेदार उत्पादने
डेन-टॉनिक®
बाळाचे दांत सुलभतेने येण्यासाठी उपयुक्त होमिओपाथिक गोळ्या
नकलेपासून सावधान
अस्सल डेन-टॉनिक® घ्या आणि बाळाचे आरोग्य सुरक्षित ठेवा
ए-पिल्स®
नकळत बिछाना ओला करणाऱ्या मुलांसाठी उपयोगी होमिओपाथिक गोळ्या
मार्केटिंग : बी. आर. एन्टरप्रायझेस, मुंबई. फोन : 8652756688 / 7219731618
सर्व प्रमुख केमिस्टकडे उपलब्ध